पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ १८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/४/कावि/३१९/२००९
दिनांक- २०/११/२००९

प्रति,

मा.......................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

**विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा [विशेष बैठक] दिनांक ०१ / १२ / ०९ रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित केलेबाबत...**

माननिय महोदय / महोदया,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा [विशेष बैठक] मंगळवार दिनांक ०१/१२/२००९ रोजी सकाळी ११:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरणार आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामाकरिता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

सूचना

[महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (एच)(आय) अन्वये.]

## कार्यपत्रिका क्रमांक- ४०

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा [विशेष बैठक] मंगळवार दिनांक ०१ डिसेंबर २००९ या दिवशी सकाळी ११:०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील कामकाज होईल.

निवडणुका

विषय क्रमांक :- १) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ प्रमाणे करणे.

[ टिप-१) महाराष्ट्र महानगरपालिका ( महापौर पदांचे आरक्षण) नियम २००६ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद "अनारक्षित" असे आहे.]

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.५ अन्वये मा. महापौर व मा. उपमहापौर यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा. विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल.

------

सही/-

( **सु.बा.काळे** )

नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
पिंपरी, पुणे-४११०१८
क्र.नस/४/कावि/३१९/२००९
दिनांक :- २०/११/२००९

---

(टिप :- प्रस्तूत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)